**राज्यातील शासन मान्यताप्राप्त खाजगी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित शिक्षण संस्थांमधील व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेणाऱ्या अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागास वर्ग व विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक शुल्काच्या प्रतिपूर्तीची योजना लागू करण्याबाबत...**

**महाराष्ट्र शासन**
**सामाजिक न्याय व विशेष सहाय विभाग**
**शासन शुध्दिपत्रक क्र. देशियो-२०२५/प्र.क्र.८१/शिक्षण-१**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक :-१८ जून, २०२५.

**संदर्भ :-**१) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय क्रमांक ईबीसी-२०१६/प्र.क्र.२२१/शिक्षण-१, दि.३१.०३.२०१६.
२) आदिवासी विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक व्यअप्र-२०२१/ प्र.क्र.९४/का-१२, दि.१७.०१.२०२२
३) आदिवासी विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक शिष्यवृ-२०२१/ प्र.क्र.७५/का-१२, दि.१७.०१.२०२२
४) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय क्रमांक ईबीसी-२०२३/प्र.क्र.११४/शिक्षण-१, दि. २९.०७.२०२४

**सुधारणा/ शुध्दिपत्रक-**

१. सन २०१८-१९ पासून राज्य शासनाने राज्यातील सर्व विभागांच्या शिष्यवृत्ती योजनांकरिता विकसित केलेले "महाडीबीटी" पोर्टल, राज्यातील अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांचे कॅपद्वारे विविध राऊंड मध्ये झालेले प्रवेश व सीईटी सेलने कॅप राऊंड प्रवेशाबाबत केलेल्या विविध सुधारणा तसेच महाडीबीटी प्रणालीमधील कॅप राऊंडच्या माहितीची थेट उपलब्धता, आदिवासी विकास विभाग, इतर मागास बहुजन कल्याण विभाग यांनी योजनेंतर्गत निर्गमित केलेले शासन निर्णय व त्यानुषंगाने प्रधान सचिव (सा.न्या.) यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ०६.०५.२०२५ रोजी पार पडलेल्या बैठकीत झालेल्या चर्चेच्या अनुषंगाने राज्यशासनाच्या शिक्षण शुल्क परीक्षा शुल्क (फ्रीशिप) योजनेतील संदर्भाधिन शासन निर्णय दि. ३१ मार्च २०१६ मधील मुद्दा क्र. ४, ५ व ६ अधिक्रमित करुन खालील प्रमाणे नव्याने सुधारणा करण्यात येत आहे.

"४) राज्यातील ज्या अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांनी शासनाच्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेतील **(CAP)** कोणत्याही राऊंडद्वारे अलॉट झालेल्या, अथवा केंद्रीभूत प्रवेश प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर रिक्त राहिलेल्या जागांवर प्रवेश नियंत्रण समितीने मान्यता दिलेल्या संस्थास्तरावर प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना या योजनेचा लाभ लागू राहील. तथापि, अशा सर्व विद्यार्थ्यांचा नविन अथवा थेट द्वितीय अभ्यासक्रमांसाठीचा प्रवेश शासकीय केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेद्वारेच असणे आवश्यक आहे."

२. **योजनेच्या शासन निर्णयातील पदव्युत्तर पदवी या सदरात आरोग्य विज्ञान अभ्यासक्रम, उच्च व तंत्र शिक्षण विभागामार्फत चालविण्यात येणारे अभ्यासक्रम तसेच कृषी, पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग यांच्यामार्फत चालवण्यात येणाऱ्या व ज्यांचे प्रवेश केंद्रिभूत प्रवेश प्रक्रिया** (CAP) **अथवा संबंधित यंत्रणेद्वारे घेण्यात येणाऱ्या मान्यता प्राप्त प्रवेश प्रकियेद्वारे पार पाडले जातात अशा पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांचा समावेश करण्यात येत आहे.**

३. **आदिवासी विकास विभागामार्फत शासन निर्णय दिनांक** १७.०१.२०२२ **अन्वये अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना शिक्षण व परिक्षा शुल्क (फ्रिशिप) योजनेची कार्यपध्दती निर्धारीत करण्यात आलेली असून**

**ज्यामधील मुद्दा क्र.५ शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्क प्रदाने (फ्रिशिप) योजनेच्या सर्वसाधारण अटी व शर्ती मधील अनु.क्र.२ मध्ये नमुद केल्याप्रमाणे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक दोन अभ्यासक्रमात कमाल ३ वर्षांचा खंड** (Gap) **ग्राह्य धरला जाईल अशी तरतूद आहे. त्याच धर्तीवर योजनेंतर्गत अनुसूचित जातीच्या लाभार्थी विद्यार्थ्यांना सदर लाभ देय राहिल.**

४. प्रस्तुत शासन शुध्दिपत्रक हे महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आलेले असून त्याचा संगणक संकेतांक २०२५०६१८१७१४२१८४२२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**( वर्षा देशमुख )**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. मा. राज्यपाल यांचे प्रधान सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई.
२. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
३. मा. मंत्री / मा. राज्यमंत्री (सर्व), मंत्रालय, मुंबई
४. मा. अध्यक्ष, विधानसभा यांचे खाजगी सचिव, विधानभवन, मुंबई
५. मा. सभापती, विधानपरिषद यांचे खाजगी सचिव, विधानभवन, मुंबई
६. मा. उपाध्यक्ष, विधानसभा यांचे खाजगी सचिव, विधानभवन, मुंबई
७. मा. उपसभापती, विधानपरिषद यांचे खाजगी सचिव, विधानभवन, मुंबई
८. मा. विरोधी पक्षनेता (विधानसभा) यांचे खाजगी सचिव, विधानभवन, मुंबई
९. मा. विरोधी पक्षनेता (विधानपरिषद) यांचे खाजगी सचिव, विधानभवन, मुंबई
१०. मा.संसद सदस्य (महाराष्ट्र राज्यातील)
११. मा.विधानसभा सदस्य (सर्व), विधान भवन, मुंबई
१२. मा.विधानपरिषद सदस्य (सर्व), विधान भवन, मुंबई
१३. मा. मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई
१४. सर्व प्रशासनिक विभागाचे अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/ सचिव, मंत्रालय, मुंबई
१५. सर्व मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
१६. अपर मुख्य सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
१७. अपर मुख्य सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई
१८. अपर मुख्य सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
१९. अपर मुख्य सचिव, अल्पसंख्याक विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
२०. प्रधान सचिव, इतर मागास बहुजन कल्याण विभाग, मंत्रालय, मुंबई
२१. प्रधान सचिव, कृषि, पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स्यव्यवसाय विभाग, मंत्रालय, मुंबई
२२. सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई
२३. सचिव,सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,मंत्रालय, मुंबई
२४. आयुक्त, समाजकल्याण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
२५. आयुक्त, आदिवासी विकास आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, नाशिक
२६. आयुक्त, कृषी, महाराष्ट्र राज्य, पुणे
२७. आयुक्त, दुग्ध व्यवसाय विकास, महाराष्ट्र राज्य, मुंबई

२८. आयुक्त, मत्स्य व्यवसाय, महाराष्ट्र राज्य, मुंबई
२९. संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई
३०. संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे
३१. संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, महाराष्ट्र राज्य, मुंबई
३२. संचालक, माहिती तंत्रज्ञान, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई
३३. संचालक, पशु संवर्धन, महाराष्ट्र राज्य, पुणे
३४. संचालक, कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई
३५. कुलसचिव, सर्व कृषी / अकृषी विद्यापीठे
३६. कुलसचिव, डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे, ता.माणगांव, जि.रायगड
३७. सहसंचालक, तंत्र शिक्षण विभागीय कार्यालये (सर्व)
३८. सहसंचालक, उच्च शिक्षण, विभागीय कार्यालये (सर्व)
३९. कुलसचिव, सर्व अभिमत विदयापिठे, महाराष्ट्र राज्य
४०. महासंचालक,माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई
४१. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र - १/२, मुंबई / नागपूर
४२. महालेखापाल (लेखा परीक्षा), महाराष्ट्र - १/२, मुंबई / नागपूर
४३. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
४४.निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
४५.सह / उप सचिव (शि-१),सामाजिक न्याय व विशेष सहाय विभाग, मंत्रालय, मुंबई
४६. निवडनस्ती/शि-१.